Mahiti purvine file 239

जा.क्र.डी-१०/मा.अ/नंदेश्वर /२०१६ - ४७
कार्या. पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक:-२७/०१/२०१६

माहितीचा अधिकार

प्रति,

श्री. तुळशिदास कुशन नंदेश्वर
ता. उपाध्यक्ष अरततोंडी बहुजन मुक्ती पार्टी
पो. कोकडी ता. देसाईगंज जिल्हा गडचिरोली

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५**
आपला दिनांक ३१/०८/२०१५ चा अर्ज

**संदर्भ:-** क्र.पोमस/२३/५४/नंदेश्वर(मा.अ)/२४/२०१६.कुलाबा मुंबई-४००००१दिनांक ११/०१/२०१६

—o—

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपला दिनांक ३१/०८/२०१५ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मा. गृहमंत्री म. राज्य मंत्रालय मुंबई सादर केलेला अर्ज जनमाहिती अधिकारी तथा पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गुन्हे) पोलीस महासंचालक यांचे कार्यालयाकडून या कार्यासनास दिनांक २२/०१/२०१६ रोजी प्राप्त झाला.

सदर प्राप्त अर्जाचे अवलोकन केले असता आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे आपले अर्ज माहिती मागण्या संबंधात असुन आपण तक्रार केल्याचे दिसुन येत आहे. परंतु आपणास कोणती माहिती पाहिजे आहे की तक्रार अर्ज आहे याबाबत काहीही स्पष्ट उल्लेख होत नाही त्यामुळे माहिती पुरविण्यास अडचण निर्माण होत आहे.

गडचिरोली जिल्हयात विभागाप्रमाणे स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस उपअधिक्षक (मुख्या) गडचिरोली हयांना जनमाहिती अधिकारी म्हणुन नियुक्त केले आहे संबंधित जन माहिती अधिकाऱ्यास आपणास कोणती माहिती कागदपत्र हवे आहे. त्याबाबत माहितीचे अधिकाराखाली नमुन्यात नमुद करुन नव्याने माहितीचे अधिकाराखाली अर्ज करावे. जेणे करुन आपणास माहिती पुरविणे शक्य होईल.

सदर उत्तराने आपण व्यथीत झाला असल्यास पत्र प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाचे आत प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचेकडे अपिल करण्यास मुभा आहे.

(जी.एस.बिरादार)
माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक (गृह)
गडचिरोली

**प्रत- माहितीस सविनय सादर**

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक गुन्हे
पोलीस महासंचालक याचे कार्यालय
शहीद भगतसिंग मार्ग कुलाबा
मुंबई- ४००००१

By RPAD

क्र.पोमसं/२३/५४/नंदेश्वर (मा.अ.)/२४/२०१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई : ४०० ००१
दि. ११/०१/२०१६

प्रति,

श्री. तुळशीदास कुसन नंदेश्वर
ता. उपाध्यक्ष अरततोडी बहुजन मुक्ती पार्टी
पो. कोकडी, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली

**संदर्भ:—** शासन पत्र गृह विभाग, क्र. माअअ १२१५/प्र.क्र.७३३/पोल १३, दि. ३१/१२/२०१५

**विषय :— माहितीचा अधिकार अधिनियम २००५**
आपला दि. ३१/०८/२०१५ चा अर्ज

— — — — —

INWARD
S.P. ..........
Addl. S.P. ..........
Dy. S.P. ..........
O. S. ..........
Head Clk. ..........
No. 260
Date 18 JAN 2016

महोदया,

सदरहू प्रकरणी संदर्भाधीन आपला दि. ३१/०८/२०१५ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये शासनास सादर केलेला अर्ज शासना मार्फत या कार्यालयास दि. ०७/०१/२०१६ रोजी व मला जन माहिती अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (गुन्हे) यांना दि. ०७/०१/२०१६ रोजी प्राप्त झालेला आहे. आपल्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने महितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या छाननीअंती मी खालील प्रमाणे निष्कर्षाप्रत येत आहे :—

आपल्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. सदरची माहिती पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयाशी संबंधित आहे. त्यांचे कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी यांची नेमणूक केलेली असल्याने आपला शासनास पाठविलेला उपरोक्त माहिती अधिकारातील अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील ६(३)(दोन) अन्वये पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेकडे पुढील कार्यावाहीसाठी पाठविण्यात आला आहे. तरी, याबाबत आपण कृपया त्यांच्याशी संपर्क साधावा.

Application B8

आवक--जावक 98/2096
तक्रार निवारण शाखा
पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि 22/01/2016

आपला विश्वासू
(स्वाक्षरी)
**( एल. एस. कोयलो )**
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस महानिरीक्षक यांचे उप सहायक (गुन्हे)
पोलीस महासंचालक, यांचे कार्यालय.

प्रत,

पोलीस अधीक्षक, गडचिरोली

२. सदरहू प्रकरणी अर्जदार श्री. तुळशीदास कुसन नंदेश्वर, रा. कोकडी, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली यांनी महितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत शासनास साद केलेला दि. ३१/०८/२०१५ रोजीचा अर्ज सोबत मूळ प्रतीत पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेकडे पाठविण्यात येत आहे. पोलीस अधीक्षकांना, विनंती आहे की, सदर अर्जावर महिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करून अर्जदार यांना उत्तर देवून त्याची एक प्रत या कार्यालयास अभिलेखासाठी पाठवावी.

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३६

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३८ यांनी कृपया सदर पत्र डाक नोंद टपालाने पाठवावे. तसेच सदर पत्राची देय पोच प्राप्त होताच त्याची मूळ प्रत कार्यासन क्रमांक २३ कडे अभिलेखासाठी पाठवावी.